# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 May 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – १६ मे २०२४ सायंकाळी ६.१०

****

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या चार टप्प्यात देशात ६६ पूर्णांक ९५ टक्के मतदान, ४५ कोटींहून अधिक मतदारांनी बजावला हक्क
- घाटकोपर दुर्घटनेतील मृतांची संख्या सोळावर, बचावकार्य पूर्ण
- मान्सून ३१ मे च्या सुमारास केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त

आणि

- येत्या दोन दिवसांत मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता, बीड, लातूरमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी

****

देशात सुरु असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या चार टप्प्यात ४५ कोटींहून अधिक लोकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. निवडणूक आयोगाच्या वतीनं ही माहिती देण्यात आली. यंदाच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पहिल्या चार टप्प्यात ६६ पूर्णांक ९५ टक्के मतदान झालं आहे. मतदानाची उच्च टक्केवारी हा भारतीय मतदारांनी जगाला दिलेला संदेश आहे असं सांगत उर्वरित टप्प्यात मतदारांना मोठ्या संख्येने मतदान करण्याचं आवाहन निवडणूक आयोगानं केलं आहे.

****

मुंबईतल्या घाटकोपरमध्ये छेडानगर परिसरात महाकाय फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतलं बचावकार्य आज सकाळी साडेदहा वाजता पूर्ण झालं. मुंबई महापालिका आयुक्त भुषण गगराणी यांनी आज पत्रकारांशी बोलतांना ही माहिती दिली.

फलकाचे सुटे भाग आणि मलबा हटवण्याचं कार्यही जवळपास पूर्ण होत आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. जाहिरात फलकांचे आकार आणि संरचना स्थिरतेसह आवश्यक मानकांची सर्व संबंधित यंत्रणांनी देखील काटेकोरपणे अंमलबजावणी करणं गरजेचं असल्याचं गगराणी यांनी स्पष्ट केलं. महानगरपालिकेच्या परवानाधारक सर्व जाहिरात फलकांची तपासणी विभाग स्तरावर वेगाने सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान, १३ मे रोजी झालेल्या या दुर्घटनेत आतापर्यंत १६ जणांचा मृत्यू झाला आहे.

****

महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील पर्यावरणस्नेही ग्राहकांमुळे जवळपास २६ लाख रुपयांची वार्षिक बचत झाली आहे. 'गो-ग्रीन' योजनेनुसार, वीजग्राहकांनी छापील वीजबिलाच्या कागदाऐवजी फक्त 'ई-मेल' आणि 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात दहा रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे योजनेत सहभागी ग्राहकांची वीजबिलांमध्ये वार्षिक एकशे वीस रुपयांची बचत होत आहे. या योजनेमुळे ग्राहकांनाही तात्काळ वीज बिल, सेवा मिळत असून देयक हस्तांतरण करणंही सुलभ झालं आहे. गो-ग्रीन योजना ही काळाची गरज असून वीजग्राहकांनी या योजनेत सहभागी होऊन पर्यावरण रक्षणात योगदान द्यावं, असं आवाहन महावितरणनं केलं आहे.

****

धुळे जिल्ह्यातल्या शिंदखेडा तालुक्यातील गोराणे इथले सैन्यदलातील जवान कमलेश ज्ञानेश्वर कदम यांच्या पार्थिवावर आज दुपारी महिंदळे गावात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कदम यांना आंध्रप्रदेशात कर्तव्यावर असताना मंगळवारी वीरमरण आलं.

****

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्षातील उन्हाळी सत्र लेखी परीक्षा २४ मे ते १२ जून याकालावधीत होणार आहेत. मुक्त विद्यापीठाच्या राज्यातल्या विविध ६०१ केंद्रावर या परीक्षा होणार असल्याची माहिती परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांनी दिली. परीक्षेसंबंधी सविस्तर माहिती, परीक्षेचं वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून तिथूनच विद्यार्थ्यांनी हालतिकीट डाऊनलोड करुन घ्यावं असंही पाटील यांनी सांगितलं.

****

`लोकनिर्णय महाराष्ट्राचा` या कार्यक्रमात आजच्या भागात आपण दक्षिण – मध्य मुंबई लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात या वेळेत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर लोकसभा मतदारसंघात सात मे रोजी मतदान झालं आहे. येत्या चार जून रोजी लातूरमधील शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन इथं मतमोजणी होणार आहे. यासाठी विविध पथकं गठीत करण्यात आली असून प्रत्येक पथकातील अधिकारी, कर्मचारी यांनी आपली जबाबदारी अचूकपणे पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत काल दिल्या.

****

नैऋत्य मौसमी पाऊस ३१ मे च्या सुमारास केरळमध्ये दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. गेल्यावर्षी आठ जून रोजी मान्सून केरळमध्ये आणि ११ जून रोजी महाराष्ट्रात दाखल झाला होता. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, यंदा २८ मे ते ४ जून दरम्यान मान्सूनचा पाऊस दाखल होईल. दक्षिण अंदमानमध्ये येत्या रविवारपर्यंत मान्सून येण्याची शक्यता हवामान खात्यानं यापूर्वीच वर्तवली आहे.

****

येत्या दोन दिवसांत मराठवाड्यासह कोकण, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, जालना, लातूर, पुणे, धुळे, जळगावसह पश्चिम महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगानं वादळी वारे वाहण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातल्या केज, चिपळूण, गडचिरोली, सांगली तसंच बुलडाणा जिल्ह्यात काही ठिकाणी मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसानं हजेरी लावली.

****

लातूर शहर आणि परिसरात आज दुपारी पुन्हा एकदा वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. जिल्ह्यातील काही भागातही अवकाळी पावसानं हजेरी लावल्याचं वृत्त आहे. दरम्यान, हवामान विभागानं लातूर जिल्ह्यात 'यलो अलर्ट' जारी केला आहे. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहावं असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

****

आगामी दिवसांमध्ये उष्णतेची लाट जाणवू शकते. उष्माघात होऊ नये, यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यावा. उष्माघाताची लक्षणं जाणवल्यास तातडीनं रुग्णाच्या शरीराचं तापमान खाली आणण्यासाठी जवळच्या रुग्णालयात उपचार करून घ्यावे, असं आवाहन बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी तसंच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं केलं आहे. उष्माघातावरील उपचारासाठी शासकीय रूग्णालयांत सज्जता ठेवण्याच्या सूचनाही जिल्हा रुग्णालय प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, मान्सूनपूर्व तयारीसाठी आवश्यक कार्यप्रणालीस यंत्रणेनं सज्ज राहावं, असे निर्देश बीडचे अपर जिल्हाधिकारी डॉ.त्रिगुण कुलकर्णी यांनी आज दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात मान्सून पूर्वतयारीबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

****

नांदेड जिल्ह्यातल्या नायगाव तालुक्यात काल लालवंड इथं मंदिरात प्रसाद खाल्यामुळं शंभरहून अधिकजणांची प्रकृती बिघडली. स्थानिक रुग्णालयात अठरा जणांवर उपचार सुरु आहेत तर प्रकृती गंभीर झाल्याने आज शंभरहून अधिक जणांना नांदेड इथं उपचारासाठी हलवलं आहे. दरम्यान, पोलिसांनी पुढील कार्यवाहीसाठी प्रसादाचा नमुना तपासणीसाठी पाठवल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राष्ट्रीय डेंग्यू दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर इथं आज महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीनं विविध उपक्रम राबवण्यात आले. शहरातील सिडको एन-८ इथल्या आरोग्य सेवा केंद्रात डेंग्यू विषयक जनजागृतीपर फलक प्रदर्शनही भरवण्यात आलं. या प्रसंगी आरोग्य कर्मचाऱ्यांनी डेंग्यू बाबत दक्षता बाळगण्याची प्रतिज्ञा उपस्थितांना दिली.

****

हिंगोली जिल्ह्यातली सर्व शहरं आणि ग्रामीण भागातील फलकांचं सर्व्हेक्षण करुन अनधिकृत, धोकादायक असलेले फलकं हटविण्याचं काम तातडीनं करावं, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिल्या. हिंगोली इथं जिल्हाधिकारी कार्यालयात आज मान्सून पूर्वतयारी बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. आगामी मान्सूनमध्ये आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी पूर्वनियोजन करुन अधिक सतर्क राहावं तसंच समन्वयानं काम करावं, अशा सूचनाही पापळकर यांनी दिल्या. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

****

निझामाबाद एक्सप्रेस उद्या मुदखेड ते निझामाबाद दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. तर निझामाबाद – पंढरपूर एक्सप्रेस परवा निजामाबाद–मुदखेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे.

****

राज्यात काल जळगाव इथं सर्वाधिक ४२ अंश सेल्सियस इतकं तापमान नोंदवलं गेलं. मालेगाव, अकोला, चंद्रपूर, वाशीम इथं तापमान चाळीशीपार होतं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ३८ अंश सेल्सियस, धाराशीव इथं ३७ पूर्णांक आठ, बीड इथं ३७ पूर्णांक तीन, तर परभणी इथं ३५ पूर्णांक पाच अंश सेल्सियस इतकं तापमान नोंदवलं गेलं.

****

भारतीय फुटबॉलपटू सुनील छेत्री यानं आपली निवृत्ती आज समाजमाध्यमाद्वारे जाहीर केली. कोलकत्यात सहा जून रोजी होणारा कुवेतविरुद्धचा तो शेवटचा सामना खेळणार आहे. सुनील छेत्रीनं २००५ साली पाकिस्तानविरोधातल्या सामन्यात आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये पदार्पण केलं होतं. दीडशे आंतराराष्ट्रीय सामन्यांत ९४ गोल करण्याची कामगिरी त्याच्या नावावर आहे. सुनील हा क्रिस्तियानो रोनाल्डो आणि लिओनल मेस्सीनंतर जगातला सर्वाधिक गोल करणारा फूटबॉलपटू म्हणून ओळखला जातो.

****